# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:03.02.2025** **वार:सोमवार**

---

1. देशात अवैधरित्या राहून राजकीय प्रक्रिया विस्कळीत करणाऱ्या परदेशी नागरिकांपासून सावध राहण्याचं उपराष्ट्रपतींचं आवाहन
2. नव्या वर्षातल्या पहिल्याच महिन्यात जीएसटी कर संकलनात वृद्धी,
3. खोल समुद्रातल्या संशोधनासाठी अर्थसंकल्पात सहाशे कोटी रुपयांची तरतूद
4. बुद्धीबळात आर. प्रज्ञानंदची डी गुकेशवर मात, आणि
5. क्रिकेटमध्ये 19 वर्षाखालील महिला संघाची विश्वकरंडकाला गवसणी तर इंग्लंडविरूद्ध मालिकेत पुरूष संघाचा दणदणीत विजय

**उपराष्ट्रपती**

देशात लाखोंच्या संख्येनं अवैधरित्या राहून राजकीय प्रक्रिया विस्कळीत करणाऱ्या परदेशी नागरिकांपासून सावध राहण्याचं आवाहन उपराष्ट्रपतीं जगदीप धनखड यांनी केलं आहे. अवैध प्रवासी नागरिक देशामध्ये राहणं धोकादायक असून, अशा परदेशी घुसखोरांना निवडणुकीच्या राजकारणावर प्रभाव पडण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही, देशातल्या युवकांनी अशा राष्ट्र विरोधी घटकांचे वैचारिक मनसुबे हाणून पाडावे असं आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. नवी दिल्लीत भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या वतीने आयोजित परिषदेत ते काल बोलत होते. युवकांनी यापुढे आपल्या अस्तित्वासंदर्भातील आव्हानं ओळखून भारतीय अर्थ व्यवस्था भक्कम करण्यासाठी आर्थिक राष्ट्रवाद मनात रुजवण्याची गरज आहे असंही उपराष्ट्रपती यावेळी बोलताना म्हणाले.

**जीएसटी-जानेवारी**

नव्या वर्षाच्या पहिल्याच महिन्यात एक लाख 95 हजार कोटींपेक्षा अधिक वस्तू आणि सेवा कराचा महसूल जमा झाला आहे. गेल्या वर्षीच्या जानेवारीच्या तुलनेत त्यात 12 पूर्णांक 3 टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. केंद्रीय वस्तू आणि सेवा कर संकलन 36 हजार 77 कोटी तर राज्यसरकारचा 44 हजार 942 कोटी रुपयांचे कर संकलन जाले आहे. एकात्मिक वस्तू सेवा कराचे संकलन 1 लाख कोटी रुपयांहून अधिक असून उपकराची रक्कम 13 हजार 412 कोटी रुपये आहे. यात लडाखमध्ये सर्वाधिक 39 टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली त्या खालोखाल नागालँड, अंदमान आणि निकोबार बेटांवर ही वाढ नोंदवण्यात आली.

**सीबीडीटी**

यंदाच्या अर्थसंकल्पात 12 लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर शून्य कर आकारण्याची घोषणा आणि सर्व स्तरांवर कर टप्प्यात फेरबदल केल्यामुळे 90 टक्क्यांहून अधिक वैयक्तिक करदात्यांना नव्या कर प्रणालीचा स्वीकार करण्यासाठी प्रवृत्त केलं पाहिजे असं केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष रवी अग्रवाल यांनी म्हटले आहे. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हा सल्ला दिला आहे. कर व्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप सरकारला अपेक्षित नसल्याचंही त्यांनी या मुलाखतीत सांगितलं. आतापर्यंत 75 टक्के व्यक्तींनी नवीन कर प्रणाली स्वीकारली आहे.

**डीपओशन**

भारताच्या खोल समुद्रातील महत्त्वाकांक्षी मोहिमेसाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सहाशे कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. यामुळे समुद्रात सहा हजार मीटर खोल संशोधन करण्यासाठी, विशेषत्वाने तयार कऱण्यात आलेल्या पाणबुडी पाठवण्याच्या योजनेला गती मिळणार आहे. चेन्नईतल्या राष्ट्रीय सागरी उद्योग संस्थेने ही पाणबुडी तयार केली आहे. या वर्षी ही पाणबुडी 500 मीटर खोल पाठवून संशोधन करण्यात येईल. पुढल्या वर्षी ती 6 हजार मीटर खोलपर्यंत पाठवण्याचा वैज्ञानिकांचा प्रयत्न असेल. त्याशिवाय पृथ्वी विज्ञान मंत्रालयासाठीही अर्थसंकल्पात एक हजार 329 कोटी रुपयांची तरतूद कऱण्यात आली आहे. त्यामुळे हवामानाचा अचूक अंदाज व्यक्त करण्यास मदत होणार आहे.

**संयुक्त संसदीय समिती**

लोकसभेत आज वक्फ सुधारणा विधेयकावरील संयुक्त समितीचा अहवाल सादर होणार आहे. जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेली संयुक्त समिती हा अहवाल सादर करेल. दिलेल्या पुराव्यांची नोंदही सभागृहासमोर ठेवतील. संयुक्त संसदीय समितीनं मसुदा अहवाल आणि सुधारित विधेयक स्वीकारले तसंच विरोधी पक्षांकडून अहवालावरील त्यांच्या असहमतीच्या नोंदी सादर केल्या आहेत.

**इस्रो-उपग्रह**

अंतराळयानातील थ्रस्टर्स अयशस्वी झालानं इस्रोचा एनव्हीएस-02 उपग्रह इच्छित कक्षेत ठेवण्याच्या इस्रोच्या प्रयत्नांना अपयश आल्याचं इस्रोनं काल स्पष्ट केलं. भारताच्या स्वदेशी अंतराळ आधारित नेव्हिगेशन व्यवस्थेसाठी महत्त्वाच्या असलेल्या या उपग्रहाचे प्रक्षेपण 29 जानेवारीला झालं होतं.

**इराण-उपग्रह**

अंतराळ तंत्रज्ञान दिनानिमित्त, इराणच्या राजधानीत काल तीन स्वदेशी नव्या विकसित उपग्रहांचे अनावरण इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान आणि इतर संबंधितांच्या उपस्थितीत कऱण्यात आलं. नवाक 1, पार्स 2 आणि पार्स 1 चे अद्ययावत मॉडेल अशी त्यांची नावं आहेत. इराण अंतराळ संशोधन केंद्रानं विकसित केलेला नवाक संप्रेषण उपग्रह स्वदेशी सिमोर्ग प्रक्षेपका वाहनाच्या सुधारित आवृत्तीची चाचणी घेण्यासाठी निर्माण कऱण्यात आला असून त्यात डोसिमेट्री पेलोड, मॅग्नेटोमीटर सेन्सर बसवण्यात आले आहेत.

**जपान-सॅटेलाइट**

जपानने काल त्यांच्या नव्या एची थ्री रॉकेटद्वारे नव्या दिशादर्शक उपग्रहाचं यशस्वी प्रक्षेपण केलं. देशाला अचूक स्थाननिश्चिती प्रणाली हवी असल्यानं या उपग्रहाचं प्रक्षेपण कऱण्यात आलं. दोन आठवड्यात त्याच्या लक्ष्यित कक्षेत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

**ऋषि सुनक**

ब्रिटनचे माजी पंतप्रधान ऋषि सुनक यांनी काल दक्षिण मुंबईतल्या पारसी जिमखाना क्लब इथ भेट दिली आणि क्रिकेट खेळण्याचा आनंद लुटला. पारसी जिमखान्याच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते सहभागी झाले होते.

**कांगो-भारतीय दुतावास**

कांगोमधील भारतीय दुतावासाने बुकावूमध्ये राहाणाऱ्या भारतीय नागरिकांना सुरक्षित स्थळी जाण्याचा सल्ला दिला आहे. या नागरिकांना सुरक्षित स्थळी पोहोचवण्यासाठी विमानतळ, सीमामार्ग आणि व्यापारी मार्ग खुले केल्याचं दुतावासानं म्हटलं आहे. भारतीय दुतावासाने कांगोतल्या सुरक्षिततेच्या परिस्थितीवर बारकाईनं लक्ष ठेवून आहे. दुतावासाने भारतीय नागरिकांना सर्व

आवश्यक ओळखपत्रे आणि प्रवास दस्तावेज बरोबर बाळगण्याचं आवाहन केलं आहे. तसंच औषधे, कपडे, प्रवास दस्तावेज, खाद्यपदार्थ आणि पाणी यांसारख्या जीवनावश्यक वस्तूदेखील बरोबर ठेवण्याचा सल्लाही दिला आहे.

**<u>हर कंठ मे भारत</u>**

सांस्कृतिक मंत्रालयानं आकाशवाणीच्या सहकार्यानं नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवन इथं, हर कंठ में भारत, हा विशेष शास्त्रीय संगीत कार्यक्रम कालपासून सुरू झाला. हा कार्यक्रम 16 फेब्रुवारीपर्यंत, दररोज आकाशवाणीच्या 21 केंद्रांवरून सकाळी साडेनऊ ते साडेदहापर्यंत थेट प्रक्षेपित केला जाईल. विविध ठिकाणचे सहाशेहून अधिक कलाकार यामध्ये सहभागी होणार आहेत.

**<u>महकुंभ</u>**

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथ आज वसंत पंचमी निमित्त सध्या पहाटेपासून तिसरे अमृत स्नान सुरू आहे. वसंत पंचमीचं स्नान पवित्र आणि महत्वपूर्ण मानलं जात. आज 13 आखाडयांपैकी सर्वात प्रत्यहम स्नान करण्याचा मान महानिर्वाणी पंचायती आखाड़ा आणि शंभू पंचायती अटल आखाड़ायांना मिळाला असून, सर्व आखाडयातील साधू समाज मिरवणुकीने सांगमपाशी पोहचत आहेत. कोणतीही अनुचित घटना होऊ नये यासाठी प्रशासनाकडून दक्षता घेण्यात येत असून 50 हजार पोलिस आणि निमलष्करी दलाचे जवान बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत. विविध घाट आणि पूल हे सामान्य भाविकांसाठी खुले करण्यात आले असून सर्वप्रकरचे  व्हीआय पी पास बंद करण्यात आले आहेत तसच सर्व परिसर वाहन मुक्त करण्यात आला आहे.

**<u>बुद्धीबळ</u>**

बुद्धिबळात भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने काल रात्री टाटा स्टील मास्टर्स स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. रोमहर्षक लढतीत त्याने सध्याचा विश्वविजेता डी. गुकेशवर विजय मिळवला. विश्वनाथन आनंदनंतर प्रतिष्ठेचे विजेतेपद पटकावणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. गुकेश आणि प्रज्ञानंद दोघेही 13 फेऱ्यांनंतर साडेआठ गुणांसह बरोबरीत होते.

**<u>महिला क्रिकेट</u>**

क्वालंलपूर इथं झालेल्या 19 वर्षाखालील महिलांच्या मर्यादित वीस षटकांच्या विश्वकरंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय महिलांनी गतविजेत्या दक्षिण अफ्रिकेच्या संघाचा 9 गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण अफ्रिकेचा संघ 82 धावाच करू शकला होता, भारतीय संघानं केवळ एका गड्याच्या मोबदल्यात हे लक्ष्य पार केले. त्रिशाने नाबाद 44 तर सानिका चाळकेनं नाबाद 26 धावा केल्या.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल महिला संघांचे टी-20 विश्वकरंडकविजेत्या महिलांच्या संघाचं अभिनंदन केलं आहे. पंतप्रधानांनी समाजमाध्यमांवरील संदेशात, आपल्याला नारीशक्तीचा खूप अभिमान असल्याचं म्हटलं आहे. तसंच ही उत्कृष्ट सांघिक कामगिरी तसंच दृढनिश्चय आणि धैर्य यांचा विजय आहे, जो अनेक खेळाडूंना प्रेरणादायी ठरणार आहे.

**<u>भारत-इंग्लंड</u>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना काल भारतीय संघाने दीडशे धावांनी जिंकला. वानखेडे मैदानावर खेळवण्यात आलेल्या या सामन्यात इंग्लंडचा संपूर्ण संघ केवळ 63 चेंडूत, 97 धावांवर बाद झाला . प्रथम फलंदाजी करताना भारताने अभिषेक शर्माच्या तडाखेबंद 54 चेंडूतील 135 धावांच्या जोरावर, 247 धावा केल्या.मोहम्मद शमीने 3, वरुण चक्रवर्ती, शिवम दुबे आणि अभिषेक शर्मा यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. इंग्लंडकडून फिलिप सॉल्ट याने 55 धावा केल्या.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.